# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ / फाल्गुन ७, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(३)** | **अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(५)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

---

### दहिसर (मुंबई) नदीतील वाढते प्रदूषण रोखण्याबाबत

**(१) * २४३०९ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसर नदीमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू होऊनही मोठ्या प्रमाणावर गुरांचे मलजल थेट नदीत सोडले जात असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास दिनांक ९ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रदूषणामुळे श्रीकृष्ण नगर आणि आजूबाजूच्या रहिवासी परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून हवेत मिथेन वायूचे प्रमाण वाढल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दहिसर, पोयसर आणि ओशिवरा नद्यांवरील १४ एसटीपी प्रकल्पांसाठी १,२०० कोटी रुपये खर्च केले जात असतानाही गेल्या ४-५ वर्षांत या नद्यांच्या स्वच्छतेत कोणतीही सुधारणा झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेने सन २०२० मध्ये प्रदूषण रोखण्याचे लेखी आश्वासन देऊनही अद्याप अंमलबजावणी केली नसून नदीकाठचे गोठे हलविणे किंवा त्यांच्या मलावर प्रक्रिया करणारे स्वतंत्र प्लांट उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

दिनांक ९ जानेवारी, २०२६ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडे तसेच, दि.२ जानेवारी,२०२६ रोजी शासनास निवेदन दिले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दहिसर, पोयसर, ओशिवरा, वालभट नद्यांकरीता पुनरुज्जीवन काम करण्यात येत आहे. दहिसर नदीकरीता २ मलजल प्रक्रिया केंद्राचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर प्रकल्प ३१ मार्च,२०२६ पर्यंत कार्यान्वित होत आहे. पोयसर नदीकरीता १० मलजल प्रक्रिया केंद्र हाती घेण्यात आले असून ९ केंद्रांची कामे प्रगतीपथावर आहेत. ओशिवरा/वालभट नदीसाठी ५ मलजल प्रक्रिया केंद्राची कामे हाती घेण्यात आली असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) गोठे हलविण्याबाबत कोंडवाडा विभाग व वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत संयुक्त कार्यवाही करण्यात येते.
(५) दहिसर नदी प्रकल्पाच्या कामामध्ये १३०, पोईसर नदी प्रकल्पाच्या कामामध्ये २५५४, ओशिवरा नदी प्रकल्पाच्या कामामध्ये ७०० इतकी घरे व दुकाने बाधित असून त्यापैकी पात्र बांधकामाच्या पर्यायी सदनिका अभावी निष्कासन प्रलंबित असल्याने प्रकल्पाच्या कामात विलंब होत आहे. सदरचे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

-----------------

## डॉ. पंजाबराव देशमुख देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना सन २०२५-२६ करिता सुरु करण्याबाबत

**(२) * २७५३९ श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण पूर्ण करता यावे या हेतूने महाराष्ट्र शासनामार्फत सारथी (SARATHI) संस्थेद्वारे डॉ. पंजाबराव देशमुख देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ मध्ये सुरु करण्यात आली असून, ही योजना सन २०२१-२२ ते २०२४-२५ या कालावधीत यशस्वीपणे राबविण्यात आली असल्याने मराठा समाजातील असंख्य विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक आधार मिळाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक विद्यार्थ्यांकडे शिक्षणासाठी अन्य कोणताही आर्थिक पर्याय उपलब्ध नसल्याने ही शिष्यवृत्ती त्यांच्या शिक्षणाचा एकमेव आधार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिष्यवृत्ती योजना सन २०२५-२६ साठी अद्याप सुरु न झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना अर्ध्यावर किंवा कायम स्वरुपी शिक्षण सोडावे लागण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून डॉ. पंजाबराव देशमुख देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना सुरु करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस:** (१) होय.
(२), (३) व (४) सारथी ही स्वायत्त संस्था असून संस्थेच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने लक्ष्यित गटातील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या योजना राबविते. सदर देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना संस्थेकडून सन २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत सन २०२५-२६ मध्ये ३८८ लाभार्थ्यांना ७.२४ कोटी इतकी शिष्यवृत्तीची रक्कम वितरित करण्यात आली असून ३७९ लाभार्थ्यांना ५.९६ कोटी इतकी शिष्यवृत्ती रक्कम वितरीत करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.
संस्थेला वेगवेगळ्या योजना राबविण्यासाठी रु. ३०० कोटी एवढा अर्थसंकल्पिय निधी मंजूर करण्यात आला असून संस्थेच्या मागणीनुसार अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी पूरवणी मागणीद्वारे आणखी रु.१०० कोटी मंजूर करण्यात आले आहेत. सदर निधीचे नियोजन करुन सन २०२५-२६ मध्येही सारथी संस्थेमार्फत लक्ष्यित गटातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणास प्रोत्साहन मिळावे यासाठी योजना राबवाविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात ब्लिंक इट या ऑनलाईन अन्न वितरण सेवेद्वारे कालबाह्य खाद्यपदार्थांचे वितरण होत असल्याबाबत

**(३) * २३६२० श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात ब्लिंक इट या ऑनलाईन अन्नवितरण सेवेद्वारे कालबाह्य खाद्यपदार्थ ग्राहकांच्या घरपोच वितरित केले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंपनीकडून मालाचे लेखापरिक्षण (स्टॉक ऑडिट) न केल्यामुळे ही परिस्थिती उद्भवली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या आणि घटनांबाबत जिल्हा अथवा महानगरस्तरीय अन्न सुरक्षा अधिकारी, खाद्य व औषध प्रशासन (FSSAI) किंवा संबंधित प्राधिकरणांना सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने कोणत्या कलमांनुसार व कोणत्या तारखेला त्या नोंदवल्या गेल्या आणि त्यानुसार कोणती प्राथमिक तपासणी करण्यात आली आहे,
(५) तसेच, ऑनलाईन फूड डिलिव्हरी सेवा कंपन्यांच्या नोंदणी, परवानगी, खाद्य-सुरक्षा मानके, उत्पादन साठवणूक व कालबाह्यता तपासणीबाबत शासनाने कोणती नियामक चौकट आखली आहे आणि या चौकटीच्या अंमलबजावणीसाठी तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ऑनलाईन फूड डिलिव्हरी प्लेटफॉर्म्सवर नियंत्रण वाढविणे, स्कॅनिंग अनिवार्य करणे, पुरवठा साखळीचे लेखापरिक्षण करणे, ग्राहकांना भरपाई देणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२) व (३) FoSCoS या प्रणालीवर ब्लिंक इट या ऑनलाईन अन्न वितरण आस्थापनेव्दारे मुदतबाहय अन्न पदार्थ वितरीत झाल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यावर अन्न व औषध प्रशासन, पुणे कार्यालयाने दि.२८.११.२०२५ रोजी मे. ब्लिंक इट कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेड, पिंपळे गुरव, पिंपरी-चिंचवड, पुणे या आस्थापनेची तपासणी केली. सदर तपासणीवेळी आस्थापनेमध्ये मुदतबाहय अन्नपदार्थाचा साठा आढळून आला नाही. तपासणीवेळी आढळून आलेल्या इतर त्रुटींच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम ३२ नुसार आस्थापनेस सुधारणा नोटीस पाठविण्यात आली होती. तसेच, तक्रारी सोबत प्राप्त कागदपत्रे व सदर कंपनीच्या अभिलेखाचा सखोल तपास केल्यावर सदर कंपनीव्दारे मुदतबाहय अन्नपदार्थाची विक्री/वितरण झाल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने सदर आस्थापनेविरुध्द न्यायनिर्णय प्रकरण क्र.३०१/२०२५ दाखल करण्यात आले आहे.
(४) सदर आस्थापनेविरुध्द दि.२८.११.२०२५ रोजी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम २६(१), २६(२) (v), २७(३) (a) सहवाचन अन्न सुरक्षा व मानके (अन्न व्यवसायीक परवाने व नोंदणी), २०११ चे परि. ४ मधील भाग २ चे ८.१ व ८.२ व २.२.२(४) चे उल्लंघन करून कलम ५८ व ६६ नुसार न्यायनिर्णय प्रकरण दाखल करण्यात आले असुन त्याचा न्यायनिर्णय क्रमांक ३०१/२०२५ असा आहे.
(५) अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडून दि.०२.०२.२०१७ रोजी इ-कॉमर्स अन्न व्यावसायिकांसाठी सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना (Advisory) निर्गमित करण्यात आली आहे. त्यास अनुसरून अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील तरतुदींचे उल्लंघन आढळल्यास संबंधित आस्थापनेविरुध्द नियमोचित कारवाई करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कन्नमवार नगर, विक्रोळी (मुंबई) येथील क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाचे खाजगीकरण रद्द करण्याबाबत**

**(४)** * **२४८९९ श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्नमवार नगर, (विक्रोळी पूर्व) येथील गोरगरिब रुग्णांना मोफत आरोग्य सेवा मिळावी या उद्देशाने ३० वर्षापूर्वी ९५६० चौरस मीटरवर ४१५ कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालय एस कॉर्पोरेशन हया खाजगी संस्थेला देण्यात येत असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयाच्या खाजगीकरणास स्थानिक नागरिकांचा विरोध असून खाजगीकरणाचा निर्णय रद्द न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार सदर रुग्णालयाच्या खाजगीकरणाबाबतचा निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाची इमारत सन २०१८ मध्ये धोकादायक इमारत म्हणून घोषित केल्यामुळे रुग्णालयाच्या पुनर्बांधणीचे काम महानगरपालिकेच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर शहरात पुरेशी सार्वजनिक शौचालये उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५) * २४५८० श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये सुमारे १८ लाख लोकसंख्येसाठी फक्त २४ सार्वजनिक शौचालये उपलब्ध असून विशेषतः गर्दीच्या बाजारपेठा, शाळा व बसस्टॉप परिसरात लोकांची मोठी गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिलांसाठी सहा ठिकाणी उभारण्यात आलेली औरंगपुरा व मकबरा रोडवरील शौचालये बंद करून त्यांना कुलूप लावण्यात आल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील प्रत्येक प्रभागात चार-पाच सार्वजनिक शौचालये असणे आवश्यक असून, महापालिका अधिकारी किंवा कंत्राटदारांच्या दुर्लक्षामुळे शहरातील नागरिक, विशेषतः महिलांकरिता शौचालयांचा अभाव आणि अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकारी/कंत्राटदारांवर कारवाई करण्यासह शहरातील अपुरी शौचालये लवकरात लवकर बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही,

छत्रपती संभाजीनगर शहरात २४ शौचालये पे अँड युज पद्धतीवर चालिविली जातात. याव्यतिरिक्त, शहरामध्ये झोन क्र.१ ते १० अंतर्गत एकूण ४६ शौचालये महानगरपालिकेने बांधली असून ती विविध वसाहतींमध्ये कार्यरत आहेत. तसेच महानगरपालिकेच्या विविध ३३ शाळांच्या परिसरात विशेषत: महीला व दिव्यांग व्यक्तींसाठी शौचालये रॅम्पसह बांधण्यात आली असून सदर सर्व शौचालये कार्यरत आहेत.

याव्यतिरिक्त स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत ११ आकांशी स्वच्छतागृहे व महिला बाल कल्याण तसेच स्वच्छ महाराष्ट्र मिशन अंतर्गत १० स्वच्छतागृहे यांची अशी एकूण २१ स्वच्छतागृहांची बांधकामे प्रगतीपथावर आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

औरंगपुरा व मकबरा रोडवर दोन ठिकाणी महानगरपालिकेकडून स्वच्छतागृहे उभारण्यात आली आहेत. त्यापैकी औरंगपुरा येथील शौचालय फक्त महिलांकरिता असून महानगरपालिकेने दोन वेळा मागविलेल्या स्वारस्य प्रगटनास (EoI) प्रतिसाद न मिळाल्याने सदरील शौचालय जय काल भैरवनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांना दिनांक १९.०९.२०२४ रोजीचे करारनाम्याद्वारे ३ वर्षांकरिता भाडेतत्वावर चालविण्यासाठी देण्यात आले असून सदर शौचालय कार्यरत आहे.

मकबरा रोडवरील शौचालय महीला व पुरुष दोघांकरिता असून त्या ठिकाणी शौचालय चालविण्यासाठी प्रतिसाद लाभलेला नसल्याने ते बंद होते. तथापि, सदर शौचालय महानगरपालिकेच्या माध्यमातून वॉर्ड अधिकारी यांचेकडून साफसफाई करणाऱ्या मजुराची नियुक्ती करून चालविणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
(४) महानगरपालिकेमधील कंत्राटदारामार्फत चालविण्यात येणारी शौचालये कार्यरत आहेत. स्वच्छ भारत अभियान २.० व महिला बाल कल्याण तसेच स्वच्छ महाराष्ट्र मिशन अंतर्गत एकूण २१ स्वच्छतागृहांची बांधकामे प्रगतीपथावर असून बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करून सदर स्वच्छतागृहे नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याचे नियोजन महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने (महारेरा) घर खरेदीदारांच्या नुकसान भरपाईपोटी जारी केलेल्या आदेशाची अमंलबजावणी होत नसल्याबाबत

**(६) * २२९९० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महारेरा स्थापन झाल्यापासून घर खरेदीदारांची फसवणूक करणाऱ्या तसेच वेळेत घराचा ताबा न देणे याबाबत आलेल्या १ हजार दोनशे ९१ तक्रारदारांच्या नुकसान भरपाईपोटी ७९२ कोटी रुपयांचे वसुली आदेश माहे डिसेंबर, २०२५ अखेर जारी करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने (महारेरा) घर खरेदीदारांच्या नुकसान भरपाईपोटी जारी केलेल्या आदेशांपैकी तब्बल २०० कोटी रुपयांच्या वसुली आदेश विकासकांकडून वसुली होणे शक्य नसल्याचे कारण देऊन जिल्हाधिकाऱ्यांनी परत केले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय?
(३) असल्यास, विकासक व खरेदीदार ग्राहक यांच्यामध्ये झालेल्या कराराप्रमाणे खरेदीदारांना देण्यात येणारी घरे ही करारात नमूद क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र दिल्याच्या तक्रारी मोठया प्रमाणावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन घर खरेदीदारांची होणारी फसवणूक थांबवण्यासह तसेच फसवणूक करणाऱ्या विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

स्थावर संपदा (नियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ च्या तरतूदीनुसार महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे प्राप्त तक्रारीवर प्राधिकरणाकडून कार्यवाही करण्यात येऊन तक्रारदारांच्या नुकसान भरपाईच्या अनुषंगाने विकासकाविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास देण्यात आले आहेत.

तथापि, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून लिलाव यशस्वी न होणे, प्रॉपर्टी आढळून न येणे, बँकेत प्रॉपर्टी गहाण/ तारण असणे, न्यायालयीन प्रकरणे/ स्थगिती इ. विविध कारणांमुळे काही आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याचे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी कळवले आहे. तथापि, या संदर्भात प्राधिकरणाने संबंधित जिल्हाधिकारी यांना आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत सविस्तर सूचना दिल्या आहेत.
(३) हे खरे नाही.

(४) विकासक व घर खरेदीदार यांच्यातील करारामध्ये नमूद क्षेत्रफळापेक्षा कमी क्षेत्रफळाचे घर विकासकाने दिल्यास अशा घर खरेदीदारास उक्त अधिनियमातील कलम ३१ नुसार महारेरा प्राधिकरणाकडे तक्रार दाखल करता येते, प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने प्राधिकरणाकडून कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**मुंबईत बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात स्वमालकीच्या कमी बसगाडया शिल्लक असल्याबाबत**

**(७) * २५८३२ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील रस्ते मार्गावरील जिवनवाहिनी म्हणून ओळखली जाणाऱ्या बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात स्वमालकीच्या फक्त २४९ बस शिल्लक राहिल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे एप्रिल २०२४ पर्यंत १,१००, तर सन २०२५ पर्यंत २९८ आणि आता २४९ बस शिल्लक असून १५ वर्षे पूर्ण झालेल्या बस भंगारात काढल्या जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील प्रवाश्यांच्या संख्येनुसार साधारण १० ते १५ हजार बस अपेक्षित असून बेस्ट उपक्रमाने स्वमालकीच्या बस खरेदी न केल्यास सर्व बस वाहतुक भाडेतत्वावरील २४०० बसगाडयांद्वारे होणार असल्याने या बसगाडयांचीही देखभाल योग्य प्रकारे होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वमालकीच्या बसगाडयांची देखभाल योग्य प्रकारे करण्याबाबत तसेच बसगाड्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

बेस्ट उपक्रमाच्या नियमानुसार बसगाड्यांचे १५ वर्ष निर्धारीत आर्युमान पुर्ण झाल्यावर बसगाड्या मोडीत काढण्यात येतात. त्यामुळे बेस्ट उपक्रमात माहे एप्रिल २०२४ पर्यंत १०९८ बसेस माहे एप्रिल २०२५ पर्यंत ७५७ बसेस व सद्यस्थितीत २४९ बसेस शिल्लक आहेत.
(३) आतापर्यंत बेस्ट उपक्रमाकडे भाडेतत्वावर ६५५५ बसगाड्या घेण्यासाठी विविध पुरवठादारांशी करार करण्यात आले आहे. त्यापैकी २५१८ बसगाड्या उपक्रमाच्या सेवेत दाखल झाल्या आहेत. या बसेसची नियमीत तांत्रिक तपासणी करण्यात येते. बसेस देखभालीमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधीत पुरवठादारांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.
(४) बेस्ट उपक्रमाच्या स्वमालकीच्या बसगाड्यांची देखभाल व तांत्रिक तपासणी योग्य प्रकारे करण्यात येते. उपक्रमाच्या परिवहन विभागाद्वारे एकूण ३०८८ बसेस (२५४२ एकमजली, ४२६ मिडी व १२० दुमजली एसी विद्युत) खरेदी करण्यासाठी सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पामध्ये (सुधारीत अंदाजपत्रकात) तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय १५०० मिडी एसी बसेस भाडेतत्वावर केंद्र शासनाच्या PM.E Drive या योजने अंतर्गत घेण्याची कार्यवाही बेस्टच्या स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हॉटेल मधील मेनूकार्डमध्ये पनीर ऐवजी चीज ॲनालॉग असा उल्लेख करणे बंधनकारक असल्याबाबत

**(८) * २६१४० श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हॉटेल मधील मेनूकार्ड मध्ये पनीर ऐवजी चीज ॲनालॉग असा उल्लेख केला जाईल असा निर्णय गतसत्रात झाल्या असून देखील मेनू कार्डवर तो उल्लेख कोठेही दिसत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अन्न व औषध प्रशासनामध्ये पुरेसे अधिकारी व कर्मचारी नेमण्याची प्रक्रिया हाती घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अर्थसंकल्पात यासाठी २५७ कोटी रुपयांपैकी ५७ कोटी या विभागास प्राप्त झालेले असून, उर्वरित २०० कोटी रूपयांची तरतूद करण्याची सदय:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) अंशतः खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनातर्फे पनीर ऐवजी चीज ॲनालॉगच्या गैरवापराबाबत कार्यवाही करण्यासाठी अन्न सुरक्षा अधिकारी यांना दि.०९/०४/२०२५ रोजीच्या ज्ञापनाद्वारे निर्देश देण्यात आले आहेत.

(२) होय हे खरे आहे.

(३), (४) व (५) अन्न व औषध प्रशानास वित्तीय वर्ष २०२५-२६ करिता कार्यक्रम खर्चाअंतर्गत रू.५७.०४ कोटी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर केली होती.

विभागामार्फत कार्यक्रम खर्चाअंतर्गत चालू वित्तीय वर्षाकरिता रू.१७२.३८ कोटीची अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी डिसेंबर २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात रू.५२.७८ कोटी निधी पूरक मागणीद्वारे मंजूर करण्यात आला आहे, अशाप्रकारे वित्तीय वर्ष २०२५-२६ करिता एकूण रू.१०९.८२ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

-----------------

## राज्य शासनाच्या विविध विभागांकडे मुंबई महापालिकेची विविध अनुदानाची थकबाकी असल्याबाबत

**(९) * २३३२५ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय देरकर (वणी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागांकडे (नगरविकास, शिक्षण, गृह, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे इत्यादी) मुंबई महापालिकेची मालमत्ता, पाणीपट्टी, विविध अनुदाने इत्यादीपोटी सुमारे १० हजार ९०० कोटी रुपयांची थकबाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महापालिकेने राज्य शासनाच्या २० विभागांच्या प्रमुखांना सदरहू थकबाकी त्वरीत मिळावी अशी विनंती माहे नोव्हेंबर / डिसेंबर, २०२५ मध्ये वादरम्यान पत्र पाठवून केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिकेने थकबाकी भरण्यासंदर्भात शासनाकडे गतवर्षात देखील पत्रव्यवहार केला असून देखील अद्यापपर्यंत थकबाकी भरण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणावर थकबाकी ठेवण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन थकबाकी त्वरीत भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिककेची शासनाच्या विविध विभागांकडे दिनांक ३१ डिसेंबर,२०२५ पर्यंत रु. दहा हजार नऊशे एकतीस कोटी इतक्या रकमेची थकबाकी आहे.
(२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि.०९ डिसेंबर, २०२५ रोजी संबंधित विभागांना पत्रे पाठवून थकीत रकमा भरणा करण्याबाबत विनंती केली आहे.
(३), (४) व (५) शासनाच्या विविध विभागांकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस येणे असलेली थकित रक्कम अदा करणेबाबत शासनाच्या संबंधित विभागांकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील नवीन शासकीय वसाहतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१०) * २४६६७ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील नवीन शासकीय वसाहत येथे वास्तव्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या इमारतीची व सदनिकांची दयनीय अवस्था झाली असून सदनिकांमध्ये पावसाळयामध्ये गळती लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासकीय वसाहतीच्या इमारतींचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून सदनिकांमध्ये वापरण्यात आलेले दरवाजे, खिडक्या, शौचालयाचे सामान अत्यंत दुय्यम दर्जाचे असून इमारतीचे बांधकामही अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, इमारतीच्या पाण्याच्या टाक्या, पाईपलाईन, नळ जोडणी इत्यादी कामे अपूर्णावस्थेत असल्याने येथे वास्तव्य करणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन नवीन उभारण्यात आलेल्या शासकीय वसाहतीतील निकृष्ट दर्जाच्या इमारती व अपूर्ण कामास जबाबदार असणाऱ्या संबंधित ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०२ जुलै, २०२५ रोजी वा त्यादरम्यान सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) मुंबई वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहत येथे एकुण ६ इमारती नव्याने बांधण्यात आलेल्या आहेत.

वाटप करण्यात आलेल्या सदनिकांमधील काही रहिवाशी यांनी सदनिकेमध्ये परस्पर कामे केल्याने, तसेच त्यांचेकडून काही ठिकाणी इमारतीच्या संरचनेसदेखील धोकादायकरित्या हानी पाहचवली असल्याने काही रहिवाशांनी सदनिकेमधील नळ चालू ठेवल्याने सदनिकेमध्ये व त्या मजल्यावरील बाह्य भागात पाणी साचल्याने त्याखालील सदनिकांच्या सिलिंग बाह्य भागात ओलसरपणा निदर्शनास आला होता.

याबाबत प्रत्यक्ष पाहणी करुन संबंधित कंत्राटदाराने स्वखर्चाने दुरुस्ती करुन उपरोक्त समस्याचे निराकरण केलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे पत्र प्राप्त असून सदर पत्रातील नमूद बाबींच्या अनुषंगाने नियमानुसार तपासणी करुन तथ्य आढळल्यास शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राज्यातील विधवा महिला पेन्शन योजनेच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत**

**(११) * २४३९२ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विधवा महिला पेन्शन योजनेसाठी देण्यात येणारी रक्कम अत्यल्प असल्याने या रकमेत वाढ करण्याबाबत महिलांकडून मागणी होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचा लाभ घेताना पात्रता म्हणून दाखला मिळण्यासाठी महिलांच्या परिवाराची वार्षिक उत्पन्न मर्यादा २१०००/- रुपयांपर्यंत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर उत्पन्नाची मर्यादा एक लाखापर्यंत वाढविण्यात येऊन त्यांचे मानधन किमान रु.७०००/- इतके करून या महिलांनाही शासनाच्या इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२), (३) व (४) विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत निराधार, विधवा, किमान १८ ते ६५ वर्षाखालील निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला, तृतीयपंथी, देवदासी, ३५ वर्षावरील अविवाहीत स्त्री, तुरूंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी, सिकलसेलग्रस्त इ. घटकातील लाभार्थ्यांना दरमहा रु.१५०० इतके अर्थसहाय्य दरमहा डी.बी.टी पोर्टलद्वारे वितरीत करण्यात येते.

विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रु.१०००/- वरुन रु. १५००/- इतकी वाढ दि.५ जुलै २०२३ च्या शासन निर्णयान्वये केली आहे. तसेच सदरहू योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रु.१५००/- वरुन रु. २५००/- इतकी वाढ दि.१५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

सदर योजनेतील सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्नाची मर्यादा रु.२१,०००/- इतकी तर दिव्यांग लाभार्थ्यांसाठी रु.५०,०००/- इतकी आहे.

विशेष सहाय्य योजनेतील डी.बी.टी पोर्टलवर नोंदणी झालेल्या आधार प्रमाणीकृत लाभार्थ्यांना दरमहा डी.बी.टी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. माहे जानेवारी, २०२६ अखेर ४७,८८,५४१ इतक्या लाभार्थ्यांना डी.बी.टी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढत असल्याबाबत**

**(१२) * २३०६५ श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मंगेश**

**कुडाळकर (कुर्ला), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.देवेंद्र कोठे (सोलापूर शहर मध्य), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण व शहरी भागात विशेषत: अहिल्यानगर, वसई-विरार, सांगली, भिंवडी, रायगड, जालना व मुंबई येथे भटक्या कुत्र्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील सहा वर्षांत तब्बल ३० लाख नागरिकांना कुत्रा चावल्याच्या घटना घडल्या असुन सन २०२१ ते २०२३ मध्ये ३० व्यक्तींचा रेबीज मुळे मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच शासनाने राज्यातील प्रमुख पर्यटन स्थळांवर आणि पर्यटन विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या निवासस्थानांवर भटक्या कुत्र्यांना प्रवेश बंद केला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राणी जन्म नियंत्रण आणि रेबीज लसीकरण लागू करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना (उदा.महानगरपालिका) निधी देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सार्वजनिक ठिकाणी भटक्या कुत्र्यांना खाऊ घालणे, मोकाट कुत्र्यांवर नसबंदी व लसीकरण करण्यासदंर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांना मा. सर्वोच्च न्यायालयाने माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यातील भटक्या कुत्र्यांच्या संख्या कमी करणे, निर्बीजीकरण व रेबीज लसीकरण कार्यक्रम प्रभावीपणे करणे, आजतागत झालेल्या मृत्यूबाबत पीडितांच्या कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पर्यटन विभागाच्या अखत्यारितील जागेमध्ये भटक्या श्वानांचा वावर रोखण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दि.०५.०१.२०२६ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) होय, हे खरे आहे.

(६) मा. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने नगर विकास विभाग, शासन परिपत्रक दि.२४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना  तसेच ग्राम विकास व पंचायत राज विभाग, शासन परिपत्रक, दि.२७ नोव्हेंबर, २०२५ अन्वये राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच, केंद्र शासनाच्या प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ मधील तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना  नगर विकास विभाग, शासन निर्णय, दि.२० मार्च, २०२५ अन्वये तर राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना ग्राम विकास व पंचायत राज विभाग, शासन परिपत्रक दि.२६ नोव्हेंबर, २०२५ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## जालना शहरातील महात्मा गांधी चमन ते स्वामी विवेकानंद पुतळा या रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१३) * २३८०६ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहरातील महात्मा गांधी चमन ते स्वामी विवेकानंद पुतळा या ८०० मीटर लांबीच्या रस्त्याचे ६ कोटी रुपये खर्चून सिमेंट काँक्रीटीकरण केल्यानंतर वर्षभरातच याच रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम दिनांक १३ डिसेंबर २०२५ मध्ये सुरू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच रस्त्यावर अवघ्या वर्षभरात दोनदा वेगवेगळ्या योजनांतून निधी खर्च केल्यामुळे शासनाच्या सार्वजनिक निधीचा मोठ्या प्रमाणात अपव्यय झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामासाठी एकाच रस्त्याला दोन वेगवेगळी नावे देऊन ८५ लाख रुपयांच्या रुंदीकरणाचा स्वतंत्र ठराव मंजूर करण्यात आल्याचे माहे डिसेंबर २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सिमेंट रस्त्याचे काम करतानाच रुंदीकरणाचे काम एकत्रित करणे तांत्रिकदृष्ट्या अपेक्षित असताना जाणीवपूर्वक दोन स्वतंत्र कामांचे कंत्राट देऊन शासकीय तिजोरीवर अनावश्यक आर्थिक ताण निर्माण करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

जालना शहरातील महात्मा गांधी चमन ते स्वामी विवेकानंद पुतळा या रस्त्याच्या कामास जालना शहर महानगरपालिकेने ठराव क्र.३७, दि.२३ ऑक्टोबर, २०२३ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांनी दि.२९ जानेवारी, २०२४ रोजी रु.६ कोटी किंमतीच्या वाहतुक मार्ग (Carriage-Way) काँक्रिटीकरणाचे काम पुर्ण केले.

तथापि, सदर रस्त्यावर आठवडी बाजार भरत असल्याने व रस्त्याच्या एका बाजूला रुंदीकरण नसल्याने जालना शहर महानगरपालिकेने रु.८५ लक्ष किंमतीचे रस्ता रुंदीकरणाचे काम राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत (NCAP) हाती घेतले आहे. सदर कामाचे दि.१२ मार्च, २०२५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून, काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यात आधारभूत धान खरेदी योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१४) * २४०१५ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी आणि सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यात आधारभूत धान खरेदी योजना राबविताना स्थानिक पातळीवर कागदोपत्री खरेदी दाखवून प्रत्यक्षात कुठलीही खरेदी न करता व धान्याची उचल न करताच शेतकऱ्यांच्या सातबारा व बॅक खात्यांच्या आधारे गैरव्यवहार केला जात असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबंधित शेतकऱ्यांना आमिष दाखवून त्यांचे शेतीचे सातबारे व बॅक खात्याचा वापर केला जात असून शेतकऱ्यांकडून धान खरेदी केल्याची नोंद सातबाऱ्याच्या आधारे केली जाते व त्या खरेदी केलेल्या धान्याची रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या बॅक खात्यात टाकण्यात येते, या प्रक्रियेत मोठा गैरव्यवहार सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत रबी पणन हंगाम २०२४-२५ मध्ये ब्रम्हपुरी तालुक्यातील १८ धान खरेदी केंद्रावर १९८० शेतकऱ्यांकडून ८०,९३२.०९ क्विंटल धान खरेदी करण्यात आली आहे. तसेच, सावली तालुक्यासाठी ५ खरेदी केंद्रांना मान्यता देण्यात आली तथापि, प्रश्नांकीत कालावधीत सदर खरेदी केंद्रावर शेतकरी नोंदणी झाली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक विकास कामांमध्ये प्रभारी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड क्र.२ यांनी केलेला गैरव्यवहार

**(१५) * २७५०१ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर (का) (जि.बीड) तालुक्यातील ३२ गावांमध्ये सुरु असलेल्या सार्वजनिक विकास कामांमध्ये प्रभारी कार्यकारी अभियंता श्री. कृष्णा पानसंबळ, सार्वजनिक बांधकाम विभाग बीड क्र.२ यांनी ठेकेदारांशी आर्थिक संगनमत करुन सर्व कामे एकाच एजन्सीला देऊन बाकीच्या एजन्सीना अपात्र करुन ए.एम.सी. च्या कामामध्ये दुबार लेंथ दाखऊन कामाचे दुबारीकरण करुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाचे ३२ गावाचे कार्यक्षेत्र उपविभाग बीड कडे संलग्न करण्याबाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर व अधीक्षक अभियंता सा.बां. विभाग मंडळ धाराशिव यांनी दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान पत्राद्वारे आदेशित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंत्याची स्तरनिहाय, कामानिहाय व लेखापरिक्षणनिहाय सखोल चौकशी करण्याबाबत मा.मुख्यमंत्री तसेच संबंधित विभागांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ व १६ ऑक्टोबर, २०२५ रोजी पत्रव्यवहार करुनही अद्याप कोणतीच दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गावांतर्गत सन २०२०-२१ ते माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये लेखाशीर्ष २५१५ अंतर्गत तांडा, वस्ती, समाजकल्याण विभाग, अल्पसंख्याक शिक्षण व सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत चालू असलेल्या कामात कार्यकारी अभियत्यांनी केलेली अनियमितता व गैरव्यवहार याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जबाबदार अधिकाऱ्यांवर तसेच ठेकेदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही,

(२) होय, हे खरे आहे.

सदर कार्यक्षेत्रामध्ये मंजूर कामे अंतिम टप्प्यामध्ये असुन ती भौतिकदृष्ट्या पूर्ण करुन सर्व ३२ गावांचे कार्यक्षेत्र सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड यांच्याकडे वर्ग करण्याचे नियोजन आहे.

(३) दिनांक १४/१०/२०२५च्या पत्रावर क्षेत्रीय कार्यालयाकडून कार्यवाही प्रगतीत असुन दिनांक दि. १६/१०/२०२५चे निवेदन क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त नाही. परंतु याच विषयाचे दि.१०.१०.२०२५ रोजीचे निवेदन प्राप्त असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्नांकित लेखाशिर्षांतर्गतच्या कामाची तपासणी करणेसाठी इतर / दुसऱ्या जिल्हयातील कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली असुन त्यांचेमार्फत या कामाची चौकशी करण्यात येत आहे.

(५) सध्या चौकशी प्रगतीत असुन त्यातील निर्ष्कषांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**अशासकीय समिती गठीत नसल्याने निराधारांचे प्रस्ताव मंजूर होत नसल्याबाबत**

**(१६) * २३२७८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, विधवा परित्यक्ता योजना, दिव्यांग योजना आदी योजनांतील लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करून लाभ देण्यासाठी तालुकास्तरावर समित्या गठीत केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली, नागपूर, सोलापूर तसेच रायगड जिल्ह्यात काही तालुके वगळता अशासकीय समिती गठीत नसल्याने निराधारांचे प्रस्ताव मान्यतेविना प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन नियुक्त राजकीय व सामाजिक सदस्य समितीवर नसल्याने मंजूर प्रकरणांचे प्रमाण ९० टक्क्यांवरून ५० ते ६० टक्क्यांपर्यंत खाली आले असून यामुळे अपंग, विधवा व वृद्ध लाभार्थ्यांना लाभापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, योजनेचा लाभ मिळाला नसल्याने लाभार्थ्यांची आर्थिक अडचण निर्माण झाली असल्याने त्यांच्यामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने समिती गठीत करुन लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच समिती गठीत करण्यात आली नसल्याची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) होय, खरे आहे.

दिनांक २० ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांची निवड करण्याकरीता तालुका स्तरावर "संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती" गठीत करण्यात येते. या समितीवरील अध्यक्ष तसेच अशासकीय सदस्यांच्या नेमणुका संबंधित जिल्ह्यातील मा.पालकमंत्री यांच्या शिफारशीनुसार जिल्हाधिकारी यांचे मार्फत करण्यात येतात.

(२) अंशत: खरे आहे.

गडचिरोली व सोलापूर या जिल्ह्यातील काही तालुक्यात/नागरी क्षेत्रात संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती गठीत नसल्याने संबंधित जिल्ह्यातील मा.पालकमंत्री यांच्या शिफारसीनुसार समिती गठित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

दि.२० ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-१, नमुना-दोन मधील मुद्दा क्रमांक ४ नुसार ज्या जिल्ह्यामध्ये अशासकीय समिती गठित नसेल अशा जिल्ह्यात संबंधित जिल्हाधिकारी हे तालुकास्तरावर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती स्थापन करतात. संबंधित तालुक्यातील तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा लाभार्थी पात्र-अपात्रतेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यास पालकमंत्री नसल्याने दि.२० ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रायगड

जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये संबंधित तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय समितीमार्फत दरमहा लाभार्थी पात्र-अपात्रतेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) शासनाच्या दिनांक १३ मे, २०२५ व दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती गठित करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

विशेष सहाय्य योजनेतील डी.बी.टी पोर्टलवर नोंदणी झालेल्या आधार प्रमाणिकृत लाभार्थ्यांना दरमहा डी.बी.टी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. माहे जानेवारी, २०२६ अखेर ४७,८८,५४१ इतक्या लाभार्थ्यांना डी.बी.टी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

-----------------

## मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर येथील अधिक्षक अभियंता यांनी केलेला गैरव्यवहार

**(१७) * २६४०१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरीतील मार्ग विकास विभाग, क्रमांक ४ मधील रस्ते कामांबाबत मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर येथील अधिक्षक अभियंता श्रीमती संध्या सापटणेकर यांनी पश्चिम- द्रुतगती महामार्ग कलानगर ते दहिसर या संपूर्ण पट्ट्यातील रस्त्यांची कामे एकत्र निविदेत न आणता, तीन लाखांच्या छोट्या भागांमध्ये विभागून निविदा प्रक्रिया टाळली व शासनाने रद्द केलेली कामे पुन्हा कागदावर आणून काम न करता काम झाल्याचे दाखविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३०५४ अंतर्गत कोणतेही देयक देण्याआधी प्रत्यक्ष तपासणी, तक्रार निवारण व करार अटींची खात्री आवश्यक असताना अधिक्षक अभियंता यांनी कंत्राटदारांना थेट चेंबूर कार्यालयात बोलावून कार्यकारी अभियंता यांना काम तपासणीची संधी न देता निधी वाटपाची पत्रे कंत्राटदारांना देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी श्रीमती संध्या सापटणेकर यांच्या विरोधात दिनांक २१ जून, २०२३ रोजी वा त्यादरम्यान चौकशी समिती नेमून १५ दिवसांत अहवाल देण्याचे आदेश दिले असूनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन जबाबदार दोषींवर गैरव्यवहार केल्याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही,

सदरचे काम सन २०१६-१७ मधील असून, श्रीम. सापटणेकर या अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर या पदावर दि.२२.१०.२०२१ ते दि.०५.०६.२०२५ या कालावधीत कार्यरत होत्या.

(२) ३०५४ मार्ग व पुल या लेखाशिर्षाखाली मार्च २०२२ मध्ये श्रीम.सापटणेकर, अधीक्षक अभियंता यांनी देखभाल व दुरुस्तीवरील कामांची देयके अदा करण्यासाठी एकूण ५ पत्रान्वये कार्यकारी अभियंता, मार्ग विकास विभाग क्र. ४, अंधेरी यांच्या अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर अनुदान उपलब्ध करुन दिले आहे. त्यापैकी, २ पत्रांसोबत कामाचा करारनामा क्रमांक व अदा करावयाच्या रकमेची यादी जोडल्याचे दिसून येते.

(३) श्रीम. सापटणेकर, अधीक्षक अभियंता यांनी दि.२१.०६.२०२३ रोजीच्या आदेशान्वये प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यकारी अभियंता, मुंबई रस्ते व संकल्पचित्र विभाग क्र.१, वडाळा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. मात्र, सदर समितीकडून अहवाल उपलब्ध होऊ शकला नाही.

(४) व (५) अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर, मुंबई यांचेकडून शासनाच्या दि.२९.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अहवाल मागविण्यात आला होता. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी दि.१३.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला होता. मात्र, सदर अहवालात विविध त्रुटी आढळून आल्याने त्रुटीपूर्तता अहवाल सादर करणेबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांना दि.०८.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

-----------------

**मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पुरेशी सार्वजनिक शौचालये उपलब्ध नसल्याबाबत**

**(१८) * २३८२६ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पुरेशी सार्वजनिक शौचालये नसल्यामुळे मुंबईकरांची कुंचबणा होत असून स्वच्छ भारत अभियानातील निकषानुसार १०० ते ४०० पुरुषांसाठी एक तर १०० ते २०० महिलांसाठी १ शौचकुप असणे आवश्यक असताना प्रत्येकी एका शौचकुपाचा ७५२ पुरुष तर १८२० महिला वापर करीत असल्याचे सन २०१८ ते २०२४ या कालावधीत दिसून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२३ मध्ये ६,६७६ सामुदायिक शौचालयाची पाहणी केली असताना त्यापैकी ७ टक्के म्हणजेच ४,०१० ठिकाणी वीज उपलब्ध नसणे, ४,५१८ ठिकाणी पाणीपुरवठयाची व्यवस्था नसणे, तसेच निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे अपूर्णावस्थेत व स्वच्छता नसलेली हजारो शौचालये असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी तब्बल ७४,३६६.७६ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर करुनही झोपडपट्टी भागात व अन्य ठिकाणी सामुदायिक शौचालयाची दूरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना आवश्यक व योग्य पध्दतीने शौचालयाची व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका म्हाडा, CSR व इतर संस्था यांनी बांधलेली ८१८८ शौचालये असून त्यामध्ये एकूण १००८०० इतक्या शौचकूपी आहेत.

(२) एकूण ८१८८ शौचालयांना बहुतांश पाणी व विद्युत जोडणी आहे. तसेच ४३०९ शौचालयांच्या देखभालीसाठी वस्ती पातळीवरील संस्था (CBO) बनविण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच या संस्था तयार झाल्यावर शौचालयांमध्ये पाणी व विद्युत पुरवठा करण्यात येत आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ५९४ ठिकाणी सामुदायिक शौचालये बांधण्याकरीता आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रु.१०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सद्यस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण २४३ शौचालयांची कामे पूर्ण झालेली आहेत व १२० शौचालयांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) योग्य पध्दतीने शौचालयाची व्यवस्था करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे म्हाडाने बांधलेल्या शौचालयांना वस्ती पातळीवरील संस्था (CBO) बनविण्याची प्रक्रिया सुरु आहे.

विभाग स्तरावर वस्ती पातळीवरील संस्था यांच्या बैठका घेऊन त्यांना शौचालय स्वच्छतेबाबत मार्गदर्शन जनजागृती केली जात आहे.

प्रत्येक विभाग स्तरावर २५ विभागात सामुदायिक शौचालयांचे पर्यवेक्षण करण्यासाठी २९ कंत्राटी समाज विकास अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबईतील भांडुप पश्चिम स्टेशन रोड येथे बेस्टचा झालेला अपघात

**(१९) * २३४६३ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.धनंजय मुंडे (परळी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.संजय देरकर (वणी), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या भांडुप पश्चिम, स्टेशन रोड या गजबजलेल्या परिसरात मुंबई महानगरपालिका उपक्रमाअंतर्गत असलेल्या बेस्टच्या चालकाचा यंत्रणेवरील ताबा सुटून त्यामध्ये ५ प्रवासी जागीच ठार झाल्याचे व अन्य १० प्रवासी जखमी झाल्याची घटना दिनांक ३० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्टेशनरोडवरील परिसरात अवैध फेरीवाले आणि भाजी विक्रेत्यांमुळे परिसरात जागा अपुरी असल्यामुळे बस चालविताना चालकाला अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बस चालकाला पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले तसेच अपघातातील मृत व्यक्तींच्या कुटुंबियांस शासनाकडून ५ लाख रुपये तर बेस्ट उपक्रमामार्फत रु. २ लाख देण्याचे जाहीर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्या अनुषंगाने मृतांच्या कुटुंबियांस भरपाई देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यांत आली वा येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अशंत: खरे आहे,

मुंबईतील मध्य रेल्वेच्या भांडुप (पश्चिम) स्थानक परिसरात दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी सदर अपघात झाला असून, यामध्ये ४ व्यक्तींचा मृत्यू झाला व १० व्यक्ती जखमी झाल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मुंबईतील भांडुप (पश्चिम) स्थानक परिसरातील दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजीच्या अपघातानंतर बेस्ट प्रशासनाद्वारे सहाय्यक महाव्यवस्थापक (परि.अभि.) यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली. सदर चौकशीच्या अंती प्रथमदर्शनी हा अपघात बसचालकाच्या निष्काळजीपणामुळे तसेच बेजबाबदार व सदोष वाहन चालन पध्दतीमुळे झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर अपघातातील मृत व्यक्तींच्या कायदेशीर वारसास प्रत्येकी रुपये ५ लाख याप्रमाणे एकुण रुपये २० लाख इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता कक्षातून मंजूर केले असल्याचे शासनाच्या दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना कळविण्यात आले असून पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून करण्यात येत आहे. बेस्ट उपक्रमामार्फत सदर अपघातात मृत झालेल्या व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना रु.२ लाख एवढी आर्थिक मदत देण्यासाठी बेस्ट उपक्रमाने समिती नेमलेली असून समितीच्यावतीने अपघातातील मृतांचे कायदेशीर वारसदार पडताळणीचे काम सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गावर कृषी समृध्दी नवनगर (स्मार्ट सिटी) निर्माण करण्याबाबत

**(२०) * २३४७७ श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर आणि मुंबई-समृध्दी महामार्गाची सन २०१४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी ग्रीनफिल्ड, ही महत्वाकांक्षी संकल्पना मांडून सन २०१७ मध्ये समृध्दी महामार्गाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्यावर महामार्गालगत सुमारे ७०० किलोमीटर अंतरात १४ ठिकाणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळच्या माध्यमातून उभारण्याची तसेच त्यामधील प्रायोगिक तत्त्वावर पहिला स्मार्ट सिटी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा कृषी समृध्दी नवनगर (स्मार्ट सिटी) उभारण्याची घोषणा करण्यात आली, आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी सिंदखेडराजा तालुक्यातील माळसावरगाव तसेच देऊळगाव राजा तालुक्यातील गोळेगाव व निमखेड परिसरातील समृध्दी महामार्गालगतची सुमारे १,९८० हेक्टर जमीन निश्चित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंदखेड राजा स्मार्ट सिटी प्रकल्पाला गती न मिळाल्याने प्रकल्पासाठी जमीन दिलेल्या स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांना मोबदला न मिळणे, बँकानी कर्ज नाकारणे अशा विविध अडचणींना सामोरे जावे लागत असून माहे डिसेंबर, २०२५ मध्ये प्रकल्पग्रस्तांनी आत्मदहनाचा इशारा देऊनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मा.उपमुख्यमंत्री व अन्य मंत्र्यांचा समावेश असलेल्या उपसमितीची एकही बैठक झालेली नसल्यामुळे निर्णय न झाल्याने प्रकल्प प्रलंबित असल्याची माहिती माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी आवश्यक नियोजन, प्रशासकीय मंजुरी, निधी वितरण व अंमलबजावणीमध्ये झालेल्या विलंबामुळे शासनाच्या विकासात्मक धोरणांचा अपेक्षित लाभ सिंदखेड राजा तालुक्याला मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यासंदर्भात बैठक घेऊन कृषी समृध्दी नवनगर (स्मार्ट सिटी) प्रकल्प पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

समृध्दी महामार्गावरील १८ छेदमार्ग ( Interchange) च्या ठिकाणी नवनगर (कृषी समृध्दी केंद्र) विकसित करण्यास नगर विकास विभागाने अधिसूचना दि.०५.०६.२०१७ अन्वये ७ नवनगरे, अधिसूचना दि.२३.०४.२०१८ अन्वये १० नवनगरे व अधिसूचना दि.०२.०९.२०२० अन्वये १ नवनगर असे एकूण १८ नवनगरे विकसित करण्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास "नवनगर विकास प्राधिकरण" म्हणून प्राधिकृत केलेले आहे. अधिसूचना दि.०५.०६.२०१७ नुसार बुलढाणा जिल्ह्यामधील सिंदखेडराजा / देऊळगावराजा तालुक्यामधील सावरगावमाळ, निमखेड, गोळेगाव या गावांचा नवनगरामध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

(२) सदर प्रकल्पासाठी सिंदखेडराजा तालुक्यातील सावरगावमाळ तसेच देऊळगाव राजा तालुक्यातील निमखेड व गोळेगाव असे एकूण ३ गावांसाठी एकूण १९४५.४८ हे. आर जमीन क्षेत्राबाबतची प्रारंभिक अधिसूचना दि.०१.०२.२०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

(३) राष्ट्रमाता जिजाऊ बाल शिवबा स्मारक समिती यांचा माहे ऑक्टोबर २०२५ मध्ये प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने संबधित भूसंपादन अधिकारी यांनी दि.२१.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सिंदखेडराजा स्मार्ट सिटी प्रकल्पासंदर्भात कामकाज सुरू असल्याचे समितीस अवगत करून सामूहीक आत्महत्येचा मार्ग न अवलंबण्यासाठी विनंती करण्यात आली.

(४) प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दि.०५.०७.२०१६ रोजी गठीत केलेल्या उप समितीची बैठक दि.०३.११.२०१६ रोजी होऊन यापूर्वी लॅड पूलिंग योजनद्वारे जमीन प्राप्त करणे व विकसीत जमीनीच्या स्वरूपात मोबदला प्रदान करणे व तद्अनुषंगीक बाबीस मान्यता देण्याबाबतचा दि.०५.०७.२०१६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करून दि.०४.०१.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

(५) नियोजित नवनगरासाठी अधिसूचित जमीनीचे समाविष्ट भूधारकांनी भूसंचयन योजनेद्वारे (लॅंड पुलिंग स्किम) विकास करण्यास प्राथमिक संमती दिली होती. मात्र त्यानंतर नवनगरातील बहुतांश समाविष्ट भूधारक भूसंचयन योजनेअंतर्गत विकास करण्यास सहमती देत नाही. तसेच सदर छेद मार्ग ( Interchange) सभोवताली जमीनीचे वाढते मूल्य व वाढता बाजारभाव लक्षात घेता महामंडळास २०१३ च्या जमीन अधिग्रहण व संपादन कायद्यानुसार मोबदला देणे शक्य नाही. याच कारणामुळे महामंडळाने दि.०५.०६.२०१७, दि.२३.०४.२०१८ व दि.२०.०९.२०२० रोजीच्या अधिसूचनेअन्वये नवनगरासाठी घोषित केलेले अधिसूचना विसर्जित करून या क्षेत्रासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणात जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२१) * २६१४२ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात जाणारा एकमेव राष्ट्रीय महामार्ग असलेला मुंबई-गोवा महामार्गाचे काम मागील १८ वर्षापासून प्रलंबित असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या राष्ट्रीय महामार्गावरील इंदापूर ते कशेडी या पट्ट्यात वाहनांचे मोठ्या प्रमाणात अपघात होत असून मागील ९ महिन्यात सुमारे ३६ नागरीकांचा मृत्यु झाला तसेच अनेकजण गंभीर जखमी झाल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महामार्गावर अपघात मोठ्या प्रमाणात होत असल्याने कोकणवासियांनी संगमेश्वर येथील सोनवी पुलाजवळ रस्ता रोको आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई-गोवा महामार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत तसेच महामार्गावरील अपघात रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र राज्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ ची एकूण लांबी ४७१.३० कि.मी. असून त्यापैकी ०/०० (पळस्पे) ते कि.मी. ८४/०० (इंदापूर) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) व कि.मी. ८४/०० (इंदापूर) ते कि.मी. ४७१/३० (पात्रादेवी) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.

सदर महामार्गाच्या पनवेल ते झाराप एकूण ४३७.८८ कि.मी. लांबीपैकी सुमारे ४१७ कि.मी. लांबीचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण झालेले असून उर्वरित सुमारे १८ कि.मी. लांबीचे काम प्रगतीत आहे. सदर काम मोठे पूल / उड्डाणपूल वगळता मार्च २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

पोलीस विभागाकडून प्राप्त माहितीनुसार रायगड- जिल्ह्यातील मुंबई-गोवा रा.म.क्र. ६६ वरील इंदापूर ते कशेडी बोगदा या लांबीमध्ये मार्च २०२५ ते डिसेंबर २०२५ अखेर ४४ अपघात झालेले असून त्यामध्ये सुमारे २३ व्यक्ती मयत झाले आहेत. सदर महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरु झाल्यापासून मागील ५ वर्षामध्ये तुलनात्मकदृष्ट्या पाहता अपघातांच्या संख्येमध्ये घट झाली असून मृत्यूदरही कमी झालेला आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मुंबई-गोवा जन आक्रोश समितीच्या निवेदनास अनुसरून मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाच्या सद्यस्थितीबाबत

माहिती देण्यात आली होती.

(५) शासनाकडून महामार्ग चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने वरीष्ठ स्तरावर बैठका घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून इंदापूर व माणगाव बायपासचे काम वगळता उर्वरीत काम मे २०२६ अखेर पूर्ण करणेचे नियोजन आहे. वाहतूक सुरळीत राहावी यासाठी कंत्राटदारांना रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच पूर्ण झालेल्या कामांची देखभाल दुरुस्ती संबंधीत कंत्राटदाराकडून करुन घेण्यात येत आहे.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्याती धान खरेदीत घसरण झाल्याबाबत**

**(२२) * २३१५० श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून धानाच्या दरात मोठ्या प्रमाणात झालेल्या घसरणीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या बाजारात धानाचे भाव अवघे २६०० रुपये प्रति क्विंटल इतके असून उत्पादन खर्चाच्या तुलनेत हे दर अत्यंत अपुरे ठरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धान खरेदी करताना व्यापाऱ्यांकडून ओलाव्याच्या नावाखाली दीड किलो धानाची कपात केली जात असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळ अंतर्गत ३३ खरेदी केंद्र व पणन महासंघ अंतर्गत ३९ खरेदी केंद्रावर शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी धोरणानुसार शेतकऱ्यांकडून धान खरेदी करण्यात येत आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

याबाबत शासनाकडे/अभिकर्ता संस्थांकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(४) खाजगी व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होऊ नये याकरिता दरवर्षी केंद्र शासनाकडून किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत आधारभूत दर निश्चित केले जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे कामकाज सुरु करण्याबाबत**

**(२३) * २५३१० श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI) संदर्भातील निधी वितरण, पदभरती, प्रशिक्षण उपक्रम तसेच कार्यालयीन संरचना आदिबाबत आवश्यक स्पष्टता नसल्यामुळे संस्था निष्क्रीय अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील तत्कालीन शासनाने अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी सारथी, बार्टी व महाज्योतीच्या धर्तीवर “मार्टी” सुरु करण्याची घोषणा केली असून सदर मार्टी संस्थेचे प्रत्यक्ष कामकाज अदयाप सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधीनी अल्पसंख्याक मंत्री यांना दिनांक २० ऑक्टोबर, २०२५ रोजी वा सुमारास

लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मार्टी संस्थेच्या मुख्यालयाचे उदघाटन, पदभरती व निधी उपलब्ध करुन अल्पसंख्याक समाजाकरिता योजना सुरु करण्याबाबत कोणती अमंलबजावणी केली आहे,

(५) तसेच छत्रपती संभाजीनगरला अल्पसंख्याक आयुक्तालय, महाराष्ट्र राज्याचे कार्यालय सुरु करण्यात आले आहे, याशिवाय अधिकारी, कर्मचारी व प्रशासकीय कामासाठी ६.२५ कोटी रुपये निधी देण्याबाबतचा अध्यादेश काढला होता, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबीला दिड वर्षे झाली असून अद्यापपर्यत या संस्थेची नोंदणी, निधी, कार्यालय व योजना इ. बाबत काहीच प्रगती झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या संस्थेचे कामकाज शासकीय स्तरावर तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा अजित पवार:** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे आहे.

(४), (५), (६) व (७) अल्पसंख्यांक विभागाच्या अधिपत्याखाली छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्यांक आयुक्तालयाचे कार्यालय सुरु करण्यात आले आहे.

तसेच अल्पसख्यांक विकास विभागाच्या दि २२.०८.२०२४ च्या शासन निर्णयान्वये अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI) स्थापन करण्यात आली असून ११ पदे निर्माण करण्यास दि.१३/१/२०२६ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. संस्थेची "नोंदणी अधिनियम, १८६०" अंतर्गत नोंदणी करणे व इतर बाबींची कार्यवाही करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सन २०२५-२६ करीता मार्टी संस्थेच्या कार्यालयीन खर्चाकरीता रु.३.१२ कोटी इतका निधी पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आला आहे. सदर संस्थेचे कार्यालय तात्पुरत्या स्वरुपात हज हाऊस, छत्रपती संभाजीनगर येथे सुरु करुन, त्याचे कामकाज तातडीने सुरु करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये विकासक घर खरेदीदारांकडून आगाऊ देखभाल शुल्क वसूल करत असल्याबाबत

**(२४) * २३११७ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महारेरा कायद्यातील तरतुदींनुसार नव्या गृहनिर्माण प्रकल्पामध्ये ५१ टक्के सदनिकांची विक्री झाल्यानंतर तीन ते चार महिन्यात घर खरेदीदारांची सहकारी संस्था अथवा अन्य अधिकृत संस्था स्थापन करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सहकारी संस्था स्थापन होईपर्यंत विकासक/प्रवर्तकांना देखभाल शुल्क आकारण्याचा अधिकार असून त्यापुढे आगाऊ स्वरुपात एक किंवा दोन वर्षांचे देखभाल शुल्क आकारण्यास कायद्यात परवानगी नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अनेक गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये विकासक, नव्याने ताब्यात दिल्या जाणाऱ्या सदनिकांसाठी घर खरेदीदारांकडून प्रत्येकी १ लाख ते ५-६ लाख रुपयांपर्यंत आगाऊ देखभाल शुल्क वसूल करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुसार दोषी

विकासकांवर कारवाई करून घर खरेदीदारांची आर्थिक लूट थांबविण्यासाठी व महारेरा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

स्थावर संपदा (नियमन आणि विकास) अधिनियम २०१६ च्या कलम ११ (४) (e) मध्ये प्रवर्तक/ विकासक लागू असलेल्या कायद्यांनुसार, घर खरेदीदारांना संस्था किंवा सहकारी संस्था किंवा त्यांचे फेडरेशन तयार करण्यास सक्षम करेल. अशी तरतूद आहे.
(२) उक्त अधिनियमातील कलम ११ (४) (d) मध्ये प्रकल्पाची देखभाल करण्याची बाब जो पर्यंत प्रकल्पातील घर खरेदीदारांच्या संस्थेच्या ताब्यात येत नाही तो पर्यंत प्रकल्पातील मुलभूत सेवांची देखभाल वाजवी शुल्क आकारून करण्यास प्रवर्तक/ विकासक जबाबदार असेल अशी तरतूद आहे. याशिवाय, कलम ११ (४) (g) मध्ये प्रकल्पाचा भौतिक ताबा वाटपधारक किंवा वाटपधारकांच्या संघटनेला हस्तांतरित करेपर्यंत विकासकाने घर खरेदीदारांकडून गोळा केलेल्या रकमेमधून प्रकल्पाशी संबंधित सर्व देखभाल खर्च (जमीन किंमत, जमीन भाडे, महानगरपालिका किंवा इतर स्थानिक कर, पाणी किंवा वीज शुल्क, देखभाल शुल्क, गहाण कर्ज आणि गहाणखतांवर व्याज किंवा इतर भार आणि सक्षम अधिकारी, बँका आणि वित्तीय संस्थांना देय असलेल्या इतर दायित्वांसह) करावा, अशी तरतूद आहे.
(३) प्रकल्पातील घर खरेदीदारांना प्रकल्पातील अनियमिततेबाबत स्थावर संपदा (नियमन आणि विकास) अधिनियम, २०१६ च्या कलम ३१ नुसार तक्रार दाखल करता येते. त्यानुसार, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर तक्रार दाखल झाल्यास त्यावर प्राधिकरणाकडून कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे सोलापूर महामार्गाच्या भूसंपादनात वाढीव मोबदल्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षरीचा वापर करून केलेला गैरव्यवहार

**(२५) * २५२५८ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे सोलापूरमहामार्गासाठी लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन झाले असून त्यात वाढीव मोबदल्यासाठी ४८ दिवसात १५४ बनावट आदेश देऊन कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांची जमीन महामार्गासाठी संपादित करण्यात येते त्यांना नोटीस देऊन मोजणी करणे, त्यानंतर रक्कम मंजूर करणे या सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे जमा करणे अशी भूसंपादनाची प्रक्रिया आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर मागील तारखा टाकुन त्यांच्या सहीचे आदेश निर्गमित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ७० कोटी रुपयांची भरपाईची रक्कम २४० कोटी रुपयांनी वाढवून ३१० कोटी रुपयांपर्यंत रक्कम गेली आहे, त्यातील बनावट आदेशाच्या आधारे ७५ कोटी रुपयांचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात आले असून वाढीव मावेजाचे आदेश काढण्यासाठी १५ टक्के कमिशन घेण्यात आले असल्याच्या अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सर्व बनावट आदेश दिनांक १ मार्च ते १७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या दरम्यानचे असून दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांची बदली झाली असताना दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी एकाच दिवशी ५० आदेश काढण्यात आले आहेत, तसेच जालना नांदेड समृद्धी महामार्गामध्ये देखील अशा प्रकारे बनावट आदेश झाले असल्याची शक्यता असून त्या संदर्भाने शासन स्तरावर चौकशी समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, बनावट आदेशाद्वारे ज्या लाभार्थ्यांना अधिकची रक्कम मावेजा स्वरूपात मिळाली आहे ती तातडीने वसूल करण्यासंदर्भात अद्यापपर्यंत कुठलेही आदेश किंवा प्रक्रिया सुरू करण्यात आलेली नाही तसेच या आदेशावरील सह्या बनावट आहेत की तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांच्या आहेत याबाबत कुठलीही माहिती शासनाकडे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, याबाबत बनावट आदेशाद्वारे चुकीच्या पद्धतीने शासनाची रक्कम घेणारे जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचा तपास करून दोषी असलेल्या अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करण्यासह त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४), (५), (६) व (७) १) धुळे-सोलापूर या राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ साठीच्या बीड जिल्ह्यातील जमिन संपादन प्रकरणी घोषित निवाड्यांमध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडे लवाद म्हणून १५४ प्रकरणी दाद मागण्यात आल्याचे आणि अशा प्रकरणांमध्ये तत्कालीन मा.लवाद तथा जिल्हाधिकारी यांची बदली झाल्यानंतर मागील तारखा टाकुन आदेश निर्गमित झाल्याची बाब प्रथमदर्शनी निदर्शनास आले. सदर बाब विचारात घेता, संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणांशी निगडीत मुळ भुसंपादन निवाडा रक्कम ६८.५८ कोटी असल्याचे आणि मा. लवादाने दिलेल्या निर्णयानुसार सदरची रक्कम व्याजासह ३१०.२० कोटी झाल्याचेही निदर्शनास आले आहे. भूसंपादन जायकवाडी प्रकल्प व उपविभागीय अधिकारी, बीड कार्यालयामार्फत यापैकी ७३ कोटी रुपये संबंधित खातेदारांना वाटप करण्यात आले आहेत. जालना-नांदेड महामार्गाच्या भूसंपादनामध्ये अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) यासंदर्भात दाखल फिर्यादीच्या अनुषंगाने पोलिसांमार्फत तपास सुरु असुन प्रकरणी संबंधितांवर शिवाजीनगर पोलिस स्टेशन, बीड येथे FIR No-५४४/२०२५, दि.१९.११.२०२५ दाखल करण्यात आला आहे. तसेच मा.न्यायालयात दोषारोपपत्र क्र.३४/२०२६, दि.१६.०२.२०२६ पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात शासकीय कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षरीचे नमूने देखील अतिरिक्त मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक, गुन्हे अन्वेशन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०९.०१.२०२६ रोजी पाठविण्यात आले आहेत. सदर प्रकरणी पोलिसांमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुंबईतील प्रस्तावित मरिना प्रकल्पास स्थगिती देण्याबाबत

**(२६) * २३२५२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी सादर केलेल्या बॅकबे रेक्लेमेशनच्या सुधारित सविस्तर विकास आराखड्यास शासनाने मान्यता दिली असून या आराखड्यांतर्गत प्रस्तावित मरिना प्रकल्पास स्थानिक मच्छिमार संघटनांनी विरोध दर्शविल्याची बाब माहे डिसेंबर २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात मच्छिमार संघटनांकडून हरकती व आक्षेप नोंदविण्यात आले असतानाही त्यावर शासनाकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मरिना प्रकल्प प्रत्यक्षात उभारण्यात आल्यास स्थानिक मच्छिमारांच्या मासेमारीवर निर्बंध येण्याची शक्यता असून मरिनामधून ये-जा करणाऱ्या इतर बोटींमुळे भ्रमणमार्गावर वाहतूक कोंडी निर्माण होऊन अपघात होण्याचा धोका संभवतो,त्यामुळे मच्छिमारांच्या पारंपरिक हद्दीत सदर प्रकल्प उभारण्यात येऊ नये, अशी मागणी मच्छिमार

संघटनांकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, मरिना प्रकल्पास मच्छिमारांकडून होत असलेला विरोध लक्षात घेता, शासनाने याबाबत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बॅकबे रेक्लेमेशनच्या ब्लॉक III ते VI या अधिसूचित क्षेत्राच्या सुधारीत प्रारुप विकास योजनेस शासनाने मंजूरी दिली असून त्यासंबंधी शासन नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६, चे कलम ३१(१) अन्वये अधिसूचना दि.१५/१२/२०२५ रोजी निर्गमित केली आहे. मंजूर विकास योजनेत "मरिना" प्रस्तावित आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ नुसार प्रारुप विकास योजनेवर जनतेच्या हरकती / सूचना मागविण्यासाठी दि. ७/१०/२०२५ रोजी सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. एमएमआरडीए च्या अहवालानुसार मरिना प्रकल्पाबाबत स्थानिक मच्छीमारांच्या हरकती/ सूचना प्राप्त झाल्या होत्या.

सदरच्या प्राप्त हरकती / सूचनावंर नियोजन समितीने संबंधितांना सुनावणी देण्यात आली होती. एमएमआरडीए ने सदरहु प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३० अन्वये शासनास सादर करताना मरिनासह मंजूरीची शिफारस करण्यात आली होती. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण झालेवर शासनाने विकास योजनेस मंजूरी दिली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अंधेरी (पूर्व), मरोळ गाव परिसरातील रेशन दुकानात काळाबाजार होत असल्याबाबत

**(२७) * २४५७३ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अंधेरी (पूर्व) मरोळ गाव परिसरातील रेशन दुकान क्र. २६५२९३ येथे सुमारे २३ लाख ८६ हजार रुपये किमंतीच्या गहू आणि तांदळाचा काळाबाजार होत असल्याचे एमआयडीसी पोलिसांनी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आणला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तीन टेम्पो भरून रेशनचे धान्य जप्त करण्यात आले असून, घटनास्थळी शासनाच्या 'आनंदाचा शिधा' योजनेच्या रिकाम्या पिशव्या मोठ्या प्रमाणात आढळून आल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, एम.आय.डी.सी, पोलीस, अंधेरी (पूर्व) यांनी दि.२५.१२.२०२५ रोजी अंधेरी (पूर्व), मरोळ या विभागामध्ये दोन खाजगी मालकिच्या गोदामांवर केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ (कलम ३, ७ व ८) व भारतीय न्यायसंहिता (बी.एन.एस,२०२३ कलम ३१८ (४) व ३(५)) नुसार एफ.आय.आर दाखल करण्यात आला असून सुमारे रु.२२,८६,०००/- इतका मुद्देमाल जप्त केलेला आहे.

शासनामार्फत आनंदाचा शिधा योजना दि.१९.१०.२०२२ ते दि.१४.०८.२०२४ या कालावधीमध्ये राबविण्यात

आली.

सदर पोलीस तपासणी दरम्यान अशोक टॉवर येथील KBM कंम्पॉऊंड या ठिकाणच्या गोदामामध्ये आनंदाचा शिधा या उपक्रमाच्या ५ किलो वजनाच्या ९ रिकाम्या पिशव्या आढळून आल्या.

(३) व (४) सदर प्रकरणी जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ (कलम ३, ७ व ८) व भारतीय न्यायसंहिता (बी.एन.एस,२०२३ कलम ३१८ (४) व ३(५)) नुसार चार व्यक्तिंविरुद्ध एफ.आय.आर. दाखल केला आहे.

श्री.मोहन एस.कटारमल यांचे शिधावाटप दूकान क्रमांक २६-ड-२१३ या दुकानाचे प्राधिकारपत्र शिघ्र प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) मुंबई महानगरपालिकेकडे पाठवलेल्या गैरव्यवहाराच्या तक्रारींबाबत

**(२८) * २३०७९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सन २०१८ मध्ये (ACB) मुंबई महानगरपालिकेकडे पाठवलेल्या ४११ भ्रष्टाचाराच्या तक्रारींपैकी ४०७ प्रकरणांत पालिकेने चौकशीची परवानगी नाकारली असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या (PCA) कलम १७-अ अन्वये आवश्यक असणारी पूर्व-परवानगी नाकारल्यामुळे तब्बल ९९% प्रकरणांत प्राथमिक चौकशीही सुरू होऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निलंबित ९६ कर्मचाऱ्यांपैकी १९ कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येऊन खटले सुरु असून देखील त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपांखालील अधिकाऱ्यांना पालिकेच्या उच्चपदस्थांकडून 'संरक्षण' दिले जात असल्याने याबाबत शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कारवाई केली तसेच महानगरपालिकेत होत असलेल्या गैरव्यवहाराला आळा घालण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१८ ते २०२६ या कालावधीमध्ये ४११ प्रकरणापैकी ४०७ प्रकरणामध्ये पडताळणीअंती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे वर्ग करण्याइतपत तथ्य आढळून न आल्यामुळे महानगरपालिकेकडून मंजूरी नाकारण्यात आली.

(२) हे खरे नाही.

अशा प्रकरणी तथ्य पडताळणीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर कार्यपध्दती सुनिश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या स्तरावर तपासणी करण्यात आली.

(३) हे खरे नाही.

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली निलंबन पुनर्विलोकन समितीने दि.२७ मार्च,२०२४ रोजी झालेल्या बैठकीत लाचलुचपत प्रकरणी निलंबित असलेले ७७ व फौजदारी प्रकरणी निलंबित असलेले १९ अशा एकूण ९६ कर्मचाऱ्यांना त्यांच्याविरुद्ध नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचे स्वरुप, गंभीरता, गुन्ह्यात होणारी शिक्षा व शिक्षेचा कालावधी आणि इतर अनुषंगिक निकष लक्षात घेऊन न्यायालयीन निकाल व खात्यांतर्गत चौकशीसापेक्ष महानगरपालिकेच्या सेवेत पुन:स्थापित केले आहे. त्यांची नियुक्ती अकार्यकारी पदावर करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मुंबई-पुणे लोणावळा- खंडाळा घाटातील मिसिंग लिंक प्रकल्पासंदर्भात**

**(२९) * २५३२२ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई–पुणे प्रवासाला नवी दिशा देणारा लोणावळा-खंडाळा घाटातील मिसिंग लिंक प्रकल्पाची मुदत माहे डिसेंबर, २०२५ मध्ये संपुष्टात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुदत संपुष्टात येत असून प्रकल्पाचे काम देखील पूर्णत्वाच्या मार्गावर असले तरी अद्याप सुरक्षा प्रमाणपत्र, पर्यावरण मंजुरी व नियंत्रण सेंटर या बाबी प्राप्त झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबी मिळण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन सुरक्षा प्रमाणपत्र, पर्यावरण मंजुरी व नियंत्रण सेंटर उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्प माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करणे नियोजित होते. तथापि, सदर प्रकल्पावर काम करताना विविध भौगोलिक व तांत्रिक आव्हानामुळे प्रकल्प पूर्णतेस सुधारीत मुदत ३० एप्रिल, २०२६ पर्यंत निर्धारीत करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकल्पांसाठीची पर्यावरण विभागाची मंजुरी यापूर्वीच प्राप्त झालेली आहे. तसेच, नियंत्रण कक्षाचे काम देखील पूर्ण झालेले आहे. प्रकल्पाचे उर्वरीत स्थापत्य काम अंतिम टप्प्यात असून वाहतूक सुरु करण्यापूर्वी मानकानुसार सुरक्षा विषयक बाबी व सुरक्षा चाचण्या घेण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात भेसळयुक्त दुधाचा पुरवठा होत असल्याबाबत**

**(३०) * २३१९८ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुधातील भेसळ थांबवली नाही तर सन २०२५ च्या अखेरीस देशातील लोकसंख्येचा एक भाग जीवघेण्या आरोग्य समस्यांचा सामना करावा लागू शकतो अशी सुचना वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) ने भारतासाठी जारी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शरीराला हानिकारक युरिया, हायड्रोजन पेरोक्साइड, फॉर्मेलिन, स्वयंपाकाचे तेल, डिटर्जंट, कॉस्टिक सोडा, साखर, मीठ अशा अनेक घटकांची भेसळ दुधात केली जात असून सामान्य माणसांना भेसळयुक्त दूध आणि शुद्ध दूध यामधील फरक ओळखता येणे कठीण जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भेसळयुक्त दुधामुळे त्वचा आणि डोळयांचे आजार, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल ट्रॅक्टमध्ये जळजळ आणि अल्सर, कर्करोग, हार्मोन्सचे असंतुलन असे अनेक आजार होऊ शकतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील अंधेरी पश्चिममधील कपावाडी (कपासवाडी) परिसरात भेसळयुक्त दुधाचा राजरोसपणे पुरवठा होत असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दूध व दुग्धजन्य पदार्थाची (उदाहरणार्थ पनीर खवा मिठाई व अन्य) भेसळ होत असतानाच याची नियमित तपासणी होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, हे

ही खरे आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित भेसळ रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या संबंधितांवर कारवाई करण्यासाठी तसेच भविष्यात मुंबईसह राज्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत व अन्न व औषध प्रशासनातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, भेसळयुक्त दुधामुळे शरीरावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(४) अन्न व औप्रशासनास प्राप्त गोपनीय माहितीनुसार दि.३१/१२/२०२५ रोजी पहाटे डी. एन. नगर पोलिस ठाण्याच्या पथकासह अंधेरी पश्चिम येथील कपासवाडी येथे दुध भेसळीच्या माहितीची शहानिशा केली असता सदर ठिकाणी दुध भेसळीचा प्रकार आढळून आला नाही.

(५) हे खरे नाही.

(६) अन्न व औषध प्रशासनामध्ये अन्न सुरक्षा अधिकारी यांची ३५० पदे मंजुर असून त्यापैकी एकूण ३१८ पदे भरण्यात आली आहेत. सदर ३१८ पदांपैकी १९३ पदे नव्याने भरण्यात आली आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई, चेंबूर येथील सार्वजनिक शौचालयांच्या जमिनीवर भू-माफियांनी केलेले अतिक्रमण

**(३१) * २५१६२ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूरमधील ‘एम-पश्चिम’ विभागांतर्गत सिंधी कॉलनी, चिकूवाडी परिसरातील सार्वजनिक शौचालये भू-माफियांनी अनधिकृतपणे पाडून ती जागा बळकावल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी भू-माफियांनी १० ते १५ दिवसांच्या कालावधीत शौचालये जमीनदोस्त करून तेथे ६० ते ८० लाख रुपये किमतीची अनधिकृत दुमजली घरे बांधून त्याची विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने सदर प्रकारणी संबंधितांवर कोणतीही कारवाई न केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकाम हटवून तेथे पुन्हा शौचालय बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे तसेच भू-माफियांवर व त्यांना पाठिशी घालण्याऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महापालिकेच्या नायर रुग्णालयातील बंद असलेली कॅथ लॅब सुरु करण्याबाबत

**(३२) * २३२६० श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या मुंबई सेंट्रल येथील नायर रुग्णालयातील कॅथ लॅबमध्ये शॉर्टसर्किट झाल्यामुळे यंत्रणेचे महत्त्वाचे

भाग खराब होऊन एंजिओग्राफी, एंजिओप्लास्टी, पेसमेकर बसवणे तसेच हदयाच्या झडपांशी संबंधित उपचार सध्या होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कॅथ लॅब बंद असल्यामुळे दररोज करण्यात येणाऱ्या ८ ते १० एंजिओग्राफी, २ एंजिओप्लास्टी व इतर हृदयविकाराशी संबंधित उपचारांवर त्याचा परिणाम होऊन रुग्णांना इतर रुग्णालयात जावे लागत असल्याने रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर रुग्णालयातील कॅथ लॅब लवकरात लवकर सुरू करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

शॉर्टसर्किट झाल्यामुळे (तांत्रिक समस्यांमुळे) कार्डियाक कॅथेटरायझेशन लॅबोरेटरी १ जानेवारी, २०२६ ते १३ जानेवारी,२०२६ या कालावधीमध्ये बंद होती. आवश्यक दुरुस्ती केल्यानंतर १४ जानेवारी, २०२६ पासून कॅथ लॅब कार्यान्वित झाली आहे.
(२) हे खरे नाही.

रुग्णालयात या काळात डीएसए कॅथ लॅबमध्ये आपत्कालीन कायमस्वरूपी पेसमेकर इम्प्लांटेशन करण्यात आले. तसेच काही रुग्णांना आयसीसीयूमध्ये उपचार देण्यात आले. त्यानंतर कार्डियाक कॅथ लॅब कार्यरत झाल्यानंतर कोरोनरी अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टीसह आवश्यक उपचारात्मक आणि निदान प्रक्रिया पार पाडण्यात आल्या.
(३) मे. सिमेन्स हेल्थकेअर प्रा.लि यांना दि.१६ फेब्रुवारी,२०२५ ते ३० जून,२०२६ पर्यंत कॉम्प्रेहेन्सीव मेन्टेनन्स कॉन्ट्रक्ट (CMC) बाबत सेवा खरेदी आदेश देण्यात आलेला असून सदर मशीन व्यवस्थित कार्यन्वित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.